दुग्धशाळा व्यवस्थापक पदावर अतिरिक्त कार्यभार प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन आदेश क्र.: दुविप्र -२५१८/प्र.क्र.९५/२०१८/पदुम-६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ९ ऑगस्ट,२०१९.

प्रस्तावना :-

श्री. संजय चंद्रकांत पाखले, दुग्धशाळा व्यवस्थापक, शासकीय दूध योजना, परभणी यांची शासकीय दूध योजना, पुणे येथे बदली झाल्याने रिक्त झालेल्या पदावर अन्य कर्मचाऱ्याकडे अतिरिक्त कार्यभार सुपूर्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

आदेश :-

दुग्धव्यवसाय विकास विभागातील शासकीय दूध योजना, परभणी येथील दुग्धशाळा व्यवस्थापक वर्ग-२ या रिक्त पदावर श्री.आर.बी.साळवे, दुग्धशाळा व्यवस्थापक वर्ग-३ यांना अतिरिक्त कार्यभार या आदेशाच्या दिनांकापासून सोपविण्यात येत आहे.

२. या आदेशाच्या दिनांकापासून श्री.आर.बी.साळवे यांचे मुख्यालय शासकीय दूध योजना, भूम ऐवजी शासकीय दूध योजना, परभणी हे राहील. तसेच शासकीय दूध योजना, परभणी येथील आहरण व संवितरणाचे अधिकार पुढील आदेश होईपर्यंत श्री.आर.बी.साळवे यांच्याकडे राहतील.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०८०९१५११२४६१०१ असा आहे. हे शासन आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Sudam Eknath Andhale
Date: 2019.08.09 15:23:41 +05'30'

(सु.ए.आंधळे)
शासनाचे अवर सचिव

प्रत :

१) प्रधान सचिव(पदूम), कृषि व पदूम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय, वरळी, मुंबई.(५ प्रती)
३) प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद/पुणे/कोकण/नागपूर/अमरावती विभाग.
४) महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) १/२, मुंबई/नागपूर.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ठाणे
६) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/परभणी
७) श्री. संजय चंद्रकांत पाखले (आयुक्त,दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालयामार्फत)
८) मा.मंत्री (पदुम) यांचे स्वीय सहायक.
९) निवडनस्ती.